**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १४ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूरच्या भद्रावती येथे न्यु एरा क्लिनटेक आणि ग्रेटा एनर्जीच्या कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पाचे केले भूमिपूजन.**
2. **येत्या १ एप्रिलपासून 'फास्टॅग' वार्षिक पासचे दर अडीच टक्क्यांनी वाढणार.**
3. **मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कस्तुरचंद पार्कवर भव्य राष्ट्रध्वजाचे लोकार्पण; नागपूरच्या राष्ट्राभिमानाचे प्रतीक ठरेल भव्य राष्ट्रध्वज- फडणवीस यांचे प्रतिपादन.**
4. **विदर्भात उन्हाचा तडाखा वाढला बहुतांशी जिल्ह्याचे तापमान हे 40अंश सेल्सिअसच्या वर अमरावती जिल्ह्यात एकात्मिक हवामान जोखीम व्यवस्थापन' प्रकल्प राबविण्यात येणार.**

---------------------------------

कोळसा गॅसिफिकेशन

चंद्रपूर इथं न्यू एरा क्लीनटेक कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या ग्रीनफिल्ड कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पाचे भूमिपूजन ,आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले, या कार्यक्रमाला केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी, मंत्री आशीष जयस्वाल, खासदार प्रतिभा धानोरकर यांची उपस्थिती होती. चंद्रपूर इथं सुमारे १ हजार ६५० एकर क्षेत्रावर अब्जावधी डॉलरची गुंतवणूक करून हा प्रकल्प उभारला जाणार आहे. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया येथे स्टील हब तयार होत आहे. या परिसरात तीन लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून एक लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. राष्ट्रकार्य पूर्ण करायचे असेल तर 70 ते 80 टक्के स्थानिकांना रोजगार देणे आवश्यक आहे. असे मुख्यमंत्र्यानी यांनी यावेळी स्पष्ट केल.

***(होल्ड बाईट - फडणवीस 42 सेकंद)***

देशात कोळशाची कमी नाही. विकासासाठी तसेच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कोळशाचा उपयोग होतो. देशाच्या औद्योगिक विकासात कोळशाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे, असे केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सांगितले. ,

चंद्रपूर आणि भद्रावती या भागात नवीन तंत्रज्ञानायुक्त औद्योगिक कंपनी येत आहे. यातून या भागाचा विकास होईल. दोन्ही कंपन्यांच्या आगमनाने येथील स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून 17 हजार कोटीची गुंतवणूक भद्रावती येथे येत असल्याची माहिती रेड्डी यांनी दिली.

***(होल्ड बाईट -रेड्डी 47 सेकंद)***

या प्रकल्पात दरवर्षी ५० लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक कोळशावर प्रक्रिया करून मेथेनॉल, हायड्रोजन, इथेनॉल, युरिया तसेच शाश्वत विमान इंधनासारखी रसायने तयार केली जाणार आहेत. या प्रकल्पामुळे रसायन आयातीवरील अवलंबित्व कमी होणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळणार असल्याचं प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

---------------------------------

पंतप्रधान

पश्चिम आशियाई देशातल्या युद्धामुळे देशातील नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विरोधी पक्ष मात्र बेजबाबदारीनं वागून देशात गोंधळाचं वातावरण पसरवत असल्याची टीका त्यांनी केली. ते आज आसाममध्ये सिलचर जिल्ह्यातल्या साडेतेवीस हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या, विविध विकास कामांची दूरस्थ पद्धतीने पायाभरणी केल्यावर बोलत होते. यामध्ये सिलचरमधील उड्डाणपूल, पाथरकंडी कृषी महाविद्यालयाचा समावेश आहे. आसामच्या युवकांना स्टार्ट अप्ससाठी सहाय्य आणि प्रोत्साहन द्यायला केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा पहिला हप्ता आपण काल आसाममध्ये वितरित केला, असं मोदी यांनी सांगितलं. रालोआ सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान मोदी यांनी केला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शेतीचं आधुनिकीकरण, यांना सर्वोच्च प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

---------------------------------

विमान भाडे

आखाती देशातल्या युद्धामुळं महाग होत असलेल्या विमान इंधनाचा भार प्रवाशांवर टाकण्याचा निर्णय ,देशातल्या विमान कंपन्यांनी घेतलेला आहे. इंडिगो कंपनीनं आजपासून ही आकारणी सुरू केली आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास

करताना विमान प्रवाशांना, सव्वा चारशे ते तेवीसशे रुपये अतिरीक्त मोजावे लागतील. अकासा एअरच्या प्रवाशांना उद्यापासून ,देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करताना दोनशे ते तेराशे रुपये अतिरीक्त द्यावे लागतील. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसनं १० तारखेपासून इंधन अधिभार वसूल करणे सुरू केलं आहे.

--------------------------------

फास्ट टॅग

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने येत्या १ एप्रिलपासून 'फास्टॅग' वार्षिक पासचे दर, अडीच टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे तीन हजार रुपयांत मिळणारा हा वार्षिक पास ,आता ३ हजार ७५ रूपयांना मिळणार आहे.

--------------------------------

राष्ट्रध्वज

नागपुरात कस्तुरचंद पार्कवर साकारलेला भव्य राष्ट्रध्वज जनतेच्या राष्ट्राभिमानाचे प्रतीक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका आणि लोकमत वृत्तपत्र समूह यांनी साकारलेल्या, २०० फूट उंच भारतीय ध्वजाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, परदेशात त्या त्या देशांचे राष्ट्रध्वज उभारल्याचे दिसत होते. राष्ट्रभिमान जागविण्यासाठी भारतातही राष्ट्रध्वज उभारण्यात यावे ,अशी मागणी व्हायची मात्र त्यास फ्लॅग कोडची अडचण येत असे. ती अडचण दूर झाल्याने. देशात भव्य राष्ट्रध्वज उभारण्यात येत आहेत. नागपुरातील या ऐतिहासिक कस्तुरचंद पार्कवर उभारण्यात आलेला हा राष्ट्रध्वज, प्रत्येक नागपूरकराचा राष्ट्रभिमान जागविणारा असा आहे. याचे उत्तम आरेखन करण्यात आले आहे. नागपुरातून अन्य राज्याकडे जाणाऱ्या शहरांचे शहरांचे प्रतीकही येथील भिंतींवर दिसून येत आहेत. या शहरात असा भव्य राष्ट्रध्वज उभारण्यात आला ते अभिमानास्पद आहे.हा राष्ट्रध्वज बघून देशाभिमाने उर भरून येतो असेही त्यांनी सांगितले.2009 मध्ये कस्तुरचंद पार्क येथे राष्ट्रध्वज उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली. 2016 मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपून झाले. या राष्ट्रध्वजाचे वास्तूविशारद शांतनू भाल्ला आहेत.

--------------------------------

डॉ. नितीश भारद्वाज

दक्षिण मध्य क्षेत्रीय सांस्कृतिक केंद्राद्वारे दोन दिवसीय कला महोत्सवाचा समारोप आज अभिनेते डॉ. नितीश भारद्वाज यांच्याद्वारे सादर केल्या जाणाऱ्या महानाट्य

चक्रव्यूह याच्या मंचनाने संध्याकाळी होणार आहे यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर यांच्या उपस्थितीत संवाद साधला यावेळी त्यांनी सांगितलं की या नाटकांच्या माध्यमातून रामायण महाभारतासारख्या ग्रंथांचा बोध घेऊन त्यातील प्रासंगिकता समाजासमोर आणि नवीन पिढीसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या नाटकाचे आतापर्यंत 107 प्रयोग झाले असून हिंदी नाटकाच्या श्रुखंलेत हे नाटक मैलाचा दगड ठरला आहे अशी प्रतिक्रिया भारद्वाज यांनी व्यक्त केली. अध्यात्म हे अभियनयात आणि आयुष्यात उतरवले पाहिजे असे त्यांनी यावेळी नमुद केले.

***(होल्ड बाईट- नितीश भारद्वाज 29 सेकंद)***

मराठी मध्ये रामायण महाभारतावर बहुतांश समीक्षात्मक लेखन झाले असून इरावती कर्वे यांचे युगांत दुर्गा भागवत यांचे व्यासपर्व हे ग्रंथ वाचनीय असल्याचेही त्यांनी सांगितलं.

---------------------------------

हवामान

विदर्भात उन्हाचा तडाखा वाढत असून बहुतांशी जिल्ह्याचे तापमान हे 40 अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले आहे आज अमरावती मधील सर्वात जास्त 41 पुर्णांक 8 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली असून विदर्भामध्ये अकोला इथं 41 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस तर वाशिम यवतमाळ चंद्रपूर येथे 40 अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आला आहे नागपूरचे आजचे तापमान 39 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस होते. दरम्यान अमरावती, जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या लाटेचे संकट आणि हवामान बदलाचा धोका लक्षात घेता, जिल्हा प्रशासन आता अधिक सतर्क झाले असून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी सज्ज झाले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, गृह मंत्रालय, भारत सरकार, 'जीआयझेड'आणि 'आद्रा इंडिया' यांच्या सहकार्याने जिल्ह्यात 'एकात्मिक हवामान जोखीम व्यवस्थापन' (In CRIS) हा विशेष प्रकल्प राबविण्यात येत आहे.

---------------------------------